# फौजदारी चौकशी अर्ज क्र. ३२३/२०२३ मधील निशाणी क्र.१५ वरील आदेश

(सुरेखा अशोक वाळके व इतर वि. अशोक दत्तात्रय वाळके व इतर.)

( CNR : MHAH250030772023 )

अर्जदार यांनी मूळ अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा (येथुन पुढे संक्षिप्ततेसाठी 'सदर कायदा' असे संबोधण्यात येईल) कलम १८, १९, २०, २१ व २२ अन्वये विविध अनुतोष मिळणेकामी दाखल केलेला आहे. मूळ अर्जाचे कामकाज प्रलंबीत असताना अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज सदर कायद्याचे कलम २३ अन्वये अंतरीम पोटगी मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज अर्जदार यांनी स्वतः करीता व अर्जदार नं. २ व ३ करता सामनेवाले यांचे विरुद्ध घरगुती हिंसाचार कायदा २००५ चे विविध कलमा अंतर्गत दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ व सामनेवाले नं. १ यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्रानुसार दिनांक ०३/०६/२०११ रोजी सौ. शोभाताई रसिकलाल धारीवाल सभागृह, रामलिंग, ता. शिरुर, जि. पुणे येथे अर्जदार नं. १ हिचे आई–वडीलांनी संसार उपयोगी सर्व वस्तु देऊन सदरचा विवाह सामनेवाले नं. १ यांचे सोबत लाऊन दिला होता व तो आजतागयत कायम आहे. सदर विवाह संबंधातुन अर्जदार व सामनेवाले नं. २ मुली नामे श्रावणी व ईश्वरी झालेली आहे. लग्नानंतर अर्जदार नं. १ ही सामनेवाला नं.१ कडे नांदणेस आलेली होती. लग्नानंतर सुरुवातीचे १ वर्ष सामनेवाले यांनी अर्जदार यांना बरे सांभाळले. त्यानंतर मात्र सामनेवाले हे अर्जदार हीस विनाकारण शारिरिक व मानसिक त्रास देवू लागले. सदर सामनेवाले हे अर्जदार या सा.वाले यांच्याकडे नांदत असताना सा.वाले यांनी अर्जदार हिस शारीरीक व मानसिक त्रास दिलेला आहे. सा.वाले नं. १ यानी अर्जदार हिस अनेक वेळा मारहाण केलेली आहे. सा.वाले नं. १ यांची आई मयत झाल्या असल्यामुळे अर्जदार यांच्यावर संसाराचा संपुर्ण व्याप येत असे. सा.वाले नं. १ हे अर्जदार यांची इच्छा नसताना जबरदस्तीने शरीर संबंध ठेवत असे. सा.वाले नं. १ यांचे अनेक मलींबरोबर अनैतिक संबंध आहेत. अर्जदार यांनी अनेक वेळा सा.वाले

नं. १ यांना त्या मुलींशी फोनवर बोलताना पकडले आहे. तसेच सा.वाले नं. १ यांनी दक्षा विना मालकरी या मुलीसोबत लग्न कलेले असुन ती आज रोजी सा.वाले नं. १ यांच्यासोबत मौजे कोहकडी या ठिकाणी राहत आहे. सा.वाले हे अर्जदार हिस म्हणत आहे की मी दक्षा सोबत लग्न केलेले आहे, आता मला तुझी गरज नाही. अर्जदार नं. १ यांचे सासु या अर्जदार न. १ व सामनेवाले नं. १ यांचे लग्ना आगोदच मयत झालेल्या होत्या. त्यामुळे सामनेवाले यांची सर्वस्वी जबाबदारी हि अर्जदार नं. १ यांचेवर आलेली होती. त्याप्रमाणे अर्जदार नं. १ या सामनेवाले नं. १ यांच्या धर्मपत्नी या नात्याने सर्व जबाबदा–या व्यवस्थीत पार पाडत होत्या. सामनेवाले यांच्या घरी २ खोल्या होत्या. एवढया कुटुंबामध्ये दोन खोल्या अपु–या पडत असत. सा.वाले यांच्या घरामधील टी.व्ही. हा अर्जदार नं.१ व सामनेवाले नं. १ यांच्या बेडरुम मध्ये होता. सामनेवाले नं.२ हे इंडीयन आर्मीमधुन रिटायर्ड झालेले होते. त्यांना सुरवातीपासुनच दारु पिण्याचे व्यसन होते. सामनेवाले नं.१ यांना देखिल पुर्वीपासुनच दारु पिण्याचे व्यसन होते.

३. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, सामनेवाले नं. १ हे लग्न झाल्यानंतर कंपनी करत परंतु काही कारणास्तव सामनेवाले नं. १ यांनी कंपनीतील नोकरी सोडुन दिली. सामनेवाले नं. २ हे अर्जदार यांचे बेडरुम मध्ये असणारा टि.व्ही. पहात असताना दारु पित असत व त्याच ठिकाणी जेवण करुण अनेक वेळा झोपत असत. सामनेवाले नं. २ हे शेजारी झोपले असताना देखिल सामनेवाले नं. १ हे अर्जदार नं. १ हे शरीर संबंधासाठी जबरदस्ती करत असत. या गोष्टीची अर्जदार न. १ यांना अतिशय लज्ञा उत्पन्न होत असे परंतु अर्जदार न. १ ही निमुटपणे सहन करत असे . सदरचा प्रकार हा नेहमी घडत असे. अर्जदार नं. १ यांचे सामनेवाले नं. १ यांचेशी कोणत्याही कारणास्तव वाद झाले की, सामनेवाले नं.१ हे सर्व आपल्या बहिणी यांना सांगत असे. सामनेवाले नं.२ हे दारु पिऊन अर्जदार नं. १ यांना शिविगाळ करत असे. अर्जदार हि शेतातील काम करुण घर संसार व मुलींचे पाहुन

सर्व कामे करत होती. परंतु कधी रात्री स्वयंपाक करण्यास उशिर झाला तर सामनेवाले नं. १ व २ हे अर्जदार नं. १ यांचेशी भांडण तंटा करत असे. सामनेवाले हे घरातील संसारातील किराणा भाजीपाला गॅस अर्जदार यांना दवाखाना इ. कामे कधीच वेळेवर करत नसत. अर्जदार या कशाबश्या आहे त्या परिस्थीतमध्ये संसार करत होत्या. अर्जदार नं. १ यांना सामनेवाले नं. १ यांचे पासुन दोन मुली झाल्या या कारणावरुण देखिल अनेक वेळा मारहान करुण अर्जदार नं. १ यांना शारीरीक व मानसिक त्रास दिलेला आहे. सा.वाले नं. १ व २ हे अर्जदार नं. १ हिस म्हणत की, तुला दोन मुली झालेल्या आहेत तु आमचे काहीही उपयोगाची नाही, तु तुझ्या माहेरी निघुन जा. लग्नानंतर काही महिन्यानंतर सामनेवाले नं.१ यांनी मार्केटींकचे काम चालु केले व फोर व्हीलर गाडी घेतली होती. अर्जदार नं. १ यांना सासु नसल्यामुळे अर्जदार नं. १ यांना कधीही माहेरी जाता येत नव्हते. सामनेवाले नं. १ यांनी अनेक वेळा अर्जदार नं. १ यांचेशी भांडणे करुण अर्जदार यांना मारहाण करुण माहेरी आणुन सोडवत असे. सामनेवाले नं. १ यांनी अर्जदार यांना कधीही कोणत्याही जिवणावश्क वस्तु घरामध्ये आणुन दिलेल्या नाहीत. सामनेवाले नं. १ यांना कधीही कोणतीही वस्तु आणायला सांगितल्यास ते म्हणत की, “दिराला किंवा सास–यांना आणायला सांग". सामनेवाले न. १ व २ यांना कधीही जेवण आवडले नाही तर ते हॉटेल मधुन जेवण मागवुन खात असत.

४. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, कोरोनाच्या काळामध्ये सामनेवाले नं. ३ व ४ हे जवळपास १ वर्ष अर्जदार घरी राहण्यास होत्या. सामनेवाले न. ३ व ४ हे झोपण्यास देखील अर्जदार नं. १ रुम मध्ये होते. सामनेवाले नं. ३ व ४ हे शेजारी झोपलेले असताना देखील सामनेवाले नं. १ हे अर्जदार नं. १ यांच्याशी शरीर संबंधासाठी जबरदस्ती करायचा. सकाळी उठल्यानंतर देखिल अर्जदार नं. १ यांना सामनेवाले नं. ३ व ४ यांचेसमोर जाण्याची लाज वाटायची. सामनेवाला नं. १ यांनी अर्जदार नं. १ यांचेशी लग्न हे केवळ शरीर सुखासाठी केलेले आहे. अर्जदार नं.

१ यांची इच्छा नसताना देखिल सामनेवाले नं. १ हे अर्जदार नं. १ यांचेवर जबरदस्ती करत असे. त्यागोष्टीस नकार दिला तर सामनेवाले नं. १ हे सामनेवाले नं. २ यांना म्हणत की, "हिला कशाला करुण आणली, माझ्या इच्छेप्रमाणे मला भेटत नसेल तर, मला सोडचिठ्ठी दे, नाहितर नगर पारनेर कोर्ट चालुच आहे, तुझ्या आई–बापाला बोलावुन मला सोडचिठ्ठी दे" असे अनेक वेळा अर्जदार नं. १ यांनी शरीर सुखाला नकार दिल्यास सामनेवाले नं. १ हे अर्जदार नं. १ यांना घराबाहेर काढत असे. सामनेवाले नं. २ हे म्हणत की, "आमच्या घरातुन निघुन जा, तुला एक जमीनीची एक काकरी सुद्धा मिळनार नाही." सामनेवाले नं. २ हे अर्जदार नं. १ हिस म्हणत की, " तु जर येथे राहिली तर माझी आख्खी मिलीटरीची टिम तुला मारण्यासाठी बोलावतो". सामनेवाले नं. २ यांना मिलेटरी कॅन्टींगचे कार्ड असुन त्यांना घरातील संसारउपयोगी वस्ती या कमी किंमतीमध्ये भेटत आहेत. परंतु काहि काळानंतर सामनेवाले नं. २ यांनी त्या दखिल घरामध्ये आणणे बंद केले. सा.वाले नं. १ व २ हे सोबत दारु पित असत. सा.वाले नं. १ यांनी सा.वाले नं. २ यांना एकदा पैश्याच्या कारणावरुण देखिल मारले होते. सामनेवाले नं.१ यांना दारुचे व्यसन असल्यामुळे त्यांना मित्रांसोबत पार्टी करण्याची नेहमी सवय होती. सामनेवाले नं. १ हे अनेक वेळा त्यांच्या मित्रांना घेऊन घरी येत असत व अर्जदार नं. १ यांना मासे, मटन बनवुन देण्यास सांगत असे. सामनेवाले नं. १ व त्यांचे मित्र हे रात्री बारा ते एक वाजेपर्यत दारु पिऊन पार्टी करावयाचे व अर्जदार नं. १ यांचे रुम मध्येच झोपायचे. या गोष्टीचा अर्जदार नं. १ यांना व त्यांच्या मुली यांना प्रचंड मानसिक त्रास होत असे. कधी–कधी तर सामनेवाले नं. १ हे त्यांच्या मित्रांना घरी सोडुन जात असे. त्यामुळे अर्जदार नं. १ यांना घरामध्ये एकटे राहण्याची देखिल भिती वाटत असे. अर्जदार नं. १ या सामनेवाले नं.१ यांना अनेक वेळा म्हणत की, म्ही मला त्रास देऊ नका, माझ्याशी निट वागा," परंतु सामनेवाले नं. १ म्हणत की, "मी तुझ्याशी लग्न फक्त शरीर संबंधासाठी केलेले आहे." सामनेवाले नं.१ हे अनेक वेळा रात्री अपरात्री दारु पिऊन येऊन अर्जदार नं. १ यांना शरीर सुखाची मागणी करत.

अर्जदार नं. १ यांनी सदर गोष्टीस नकार दर्शविल्यास सा.वाले नं. १ हे अर्जदार नं. १ हिस वाईट शिवीगाळ करुण अर्जदार नं. १ हिस लाथा बुक्याने मारहाण करुण अनेक वेळा घराबाहेर काढलेले आहे. अर्जदार नं. १ व त्यांच्या मुलींनी अनेक रात्री घराच्या बाहेर ओट्यावर बसुन जागुन काढलेल्या आहेत. अर्जदार नं. १ यांनी सदरचा वरील सर्व प्रकार हा सा.वाले यांना अनेक वेळा सांगण्याचा प्रयत्न केला परंतु सामनेवाले नं. २ हे म्हणत की, “तु आमच्या घराचे वाटोळे केले आहे, तुझ्यामुळे आमच्या घरी कोणीही नातेवाईक येत नाहीत,” सामनेवाले नं. ३ ते ५ हे देखिल अर्जदार नं. १ यांची कधीही बाजु घेत नव्हते. उलट सामनेवाले नं. ३ ते ५ हे म्हणत की, “ज्याला नांदायचे असेल ते कसेही नांदतात".

५. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, दरम्यानच्या काळात सामनेवाले नं.१ यांनी बैल शर्यतीचे बैल विकत घेतले होते. परंतु घरचा कोणताही चारा नव्हता. त्यामुळे सा.वाले नं. १ हे दुस–याचा चारा गुपचुप आणुन बैलांना घालत असत. सामनेवाले नं. १ यांनी एकदा डिझेल चोरी केली होती त्या प्रकरणात देखिल मालकाने सामनेवाले नं. १ यांना नुकसान भरपाई म्हणुन ५० हजार रुपये देण्यास सांगितले होते. अर्जदार नं. १ यांनी घरगुती कोंबड्या पाळल्यातर सामनेवाले नं. २ हे म्हणत की, “तु कोंबड्या पाळल्यामुळे आमच्यावर दरीद्री आली आहे”. सामनेवाले नं. १ व २ यांचे अर्जदार नं. १ यांचे सोबत भांडणे झाले तर, सामनेवाले नं. २ हे म्हणत की, “अब्रुची असती तर तु सासर सोडुन माहेरी गेली असती.” सामनेवाले हे अर्जदार नं. १ यांचेवर सामनेवाले नं.१ यांचे भाऊ यांचेबद्दल संशय घेत असत. यावरुण देखिल अर्जदार नं. १ सामनेवाले नं. १ यांचेमध्ये भांडणे झालेली आहेत. सामनेवाले नं. १ यांचे भाऊ यांचे लग्न झाल्यानंतर २–३ महिन्यानंतरच लगेच त्यांची पत्नी त्यांना सोडून माहेरी निघुन गेली. त्याचे देखिल सामनेवाले नं. ३ ते ५ यांनी अर्जदार नं. १ यांचेवर फोडले. सामनेवाले म्हणत की, "तुझ्यामुळे आमची सुन हि या घरुन निघून गेलेली आहे” वास्तवामध्ये सदर मुलीचे दुस–या मुलाबरोबर

अनैतिक संबंध असल्यामुळे ती मुलासमोर निघुन गेली हि गोष्ट सामनेवाले यांच्या काही महिन्यानंतर त्यांचे लक्षात आली. दरम्यानच्या काळात सामनेवाले नं. १ यांचेकडे स्वतःची इरटीगा गाडी असल्याने ते गाडी भाडयाने देण्याचा व्यवसाय करत होते. सामनेवाले नं. १ यांचे अनेक मुलींशी बाहेर अफेअर आहेत. गाडी भाडयाने घेऊन चाललो असे सांगुन सामनवाले नं. १ हे मुलींना बाहेर घेऊन जाऊन स्वतःची मौज मजा करत असत. दरम्यानच्या काळात सामनेवाले नं. १ यांचे एका बाईशी अफेअर चालु होते. सामनेवाले नं.१ व त्या बाईचा संवाद अर्जदार नं. १ यांनी स्वतःच्या कानाने ऐकला की, "सामनेवाले नं. १ व ती बाई हे दोघेही शिर्डी येथे जाऊन लग्न करणार आहेत. सदरचा प्रकार हा अर्जदार न. १ यांनी आपल्या भावाला सांगितला. अर्जदार नं. १ यांच्या भावाने व अर्जदार नं. १ यांनी दोघांचाही राहुरीच्या आसपास पर्यत पाठलाग करुन त्या दोघांना जागेवर पकडले. सदर दोघांनाही जागेवर पकडल्यानंतर सदर दोन्ही व्यक्तींची तक्रार राहुरी पोलिस स्टेशनला दिली होती. सामनेवाले नं. १ यांचे ज्या बाईसोबत अफेअर आहे ती बाई मुंबई या ठिकाणची असुन त्या बाईस दिड वर्ष वयाचा मुलगा आहे. सामनवाले यांच्या या त्रासाला कंटाळुन अर्जदार नं. १ हिने विहिरीमध्ये जिव देण्याचा प्रयत्न करत होती परंतु त्या वेळी सामनेवाले नं. १ हे घरामध्ये टि.व्ही. पहात बसले होते. त्यावेळी शेजारील लोकांनी अर्जदार नं. १ हिची अडवणुक करुण तिला समजावुन सांगुन घरी आणुन सोडले. सामनेवाले नं. १ व २ यांनी अर्जदाराची संमती नसताना अर्जदार हिचे स्त्रीधन परस्पर मोडलेले आहे. अर्जदार नं. १ हि सासरी नांदत असताना सामनेवाले नं. १ व २ हे अर्जदार नं. १ हिस जास्तच शारीरीक व मानसिक त्रास देऊ लागले. घरामध्ये कोणत्याही वस्तु आणुन देत नसत त्यामुळे अर्जदार नं. १ यांना दिवस दिवस उपाशी पोटी राहवे लागत असे.

६. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, सामनेवाले नं. १ यांचे दारु पिण्याचे व्यसन हे खुप वाढले असुन ते दारु पिऊन अर्जदार नं. १ यांना मारहान

करत असत. गाडी भाडयाने घेऊन जायचे कारण सांगुन चार ते पाच दिवस घरी येत नसत. वास्तविक पाहता सा.वाले नं. १ यांना अर्जदार नं. १ यांच्या सोबत संसार प्रपंच करण्याची कधीही हौस नव्हती, केवळ सा.वाले न. १ यांची आई मयत झाल्यामुळे सा.वाले नं. १ व २ यांचे जेवणाची सोय व्हावी म्हणुन सा.वाले नं. १ यांनी अर्जदार नं. १ यांचेसोबत विवाह केलेला होता. सा.वाले नं. १ यांनी अर्जदार नं. १ यांना कधीही पत्नी म्हणुन चांगली वागणुक दिलेली नाही. त्यांना मोलकरणीप्रमाणे वागवत असे. अर्जदार नं. १ या सा.वाले यांचेकडे सर्व गोष्टीचा त्रास सहन करुण केवळ आपल्या आई वडीलांच्या इज्ञतीखातर सासरी नांदत होती. सामनेवाले नं. २ हे देखिल अर्जदार नं. १ हिस दारु पिऊन वाईट शिविगाळ करत असत. सहा महिन्यापुर्वी सामनेवाले नं. १ यांनी अर्जदार नं. १ हिस दारु पिऊन मारहाण करुण घराबाहेर काढले तेव्हापासुन अर्जदार १ हि तिच्या २ मुलींसह माहेरी राहत आहे. अश्या प्रकारे सामनेवाले यांनी कोणतेही संयुक्तीक कारण नसताना अर्जदार यांचा विनाकारण त्याग केलेला आहे. अर्जदार हि तिचे माहेरी निराश्रीत जिवण जगत आहे. त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हे कशेबशे आपल्या आई वडीलांच्या आधारावर आपले जिवण जगत आहे. अर्जदार हिच्या आई वडीलांची परिस्थिती हि अतिशय नाजुक व गरीबीची आहे. अर्जदार हिच्या आई वडीलांनी अर्जदार हिस सामनेवाला यांनी नांदवावे याबाबत अनेक प्रयत्न करुण देखिल सामनेवाले हे अर्जदार हिस नांदविण्यास तयार नाहीत. उलट सामनेवाले हे अर्जदार यांना म्हणत आहे की, “आम्हाला तु सोडचिठ्ठी दे".

७. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, सामनेवाला यांची आर्थिक परिस्थीत अत्यंत चांगली असुन सामनेवाले नं. १ यांचेकडे स्वतःचा ट्रक्टर असुन सदर ट्रक्टर हा दुस–यांच्या शेतामध्ये नांगरणी पेरणी, शेतीची सर्व मेहनत मशागतीची कामे करत आहे. त्यांना त्यापासुन खर्च वजा जाता निव्वळ रक्कम रुपये २० हजार रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. तसेच सामनेवाले नं. १ यांचेकडे स्वतःची

इरटीका हि कार असुन सदर कार हि भाडयाने देण्याचा व्यवसाय करत असुन त्यापासुन त्यांना खर्च वजा जाता २० हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळत आहे. तसेच सामनेवाले यांचे नावे कोहोकडी येथे बागायती शेत जमीन असून सदर शेतजमीन असुन सदर शेतीमध्ये कांदा, ऊस, गहु हे पिके घेत असून त्यापासून देखिल त्यांना वर्षाला रक्कम रुपये ५ लाख रुपये निव्वळ नफा मिळत आहे. तसेच सामनेवाले नं. २ हे आर्मी मधुन रिटायर झाले असुन त्यांना महिन्याला ३० हजार रुपये पेन्शन मिळत आहे. सामनेवाले नं. २ यांचे नावे डोंगरगण ता. शिरुर या ठिकाणी ४ एकर बागायती शेतजमीन असुन त्या शेतीमधुन डाळींब, बाजरी, ऊस, गहु इत्यादी पिके घेत असुन त्यापासुन ५ लाख रुपये इतका वर्षाला नफा मिळत आहे. अश्या प्रकारे सामनेवाले यांची परिस्थीत अतिशय सधन आहे. त्यांची अर्जदार यांना पोटगी देण्याची कुवत आहे. सामनेवाला यावर अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही इसम अवलंबून नाहीत. सामनेवाले यांचेकडून अर्जदार यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.१०,०००/- अंतरीम पोटगी म्हणुन देण्याबाबत आदेश होण्याची विनंती अर्जदाराने केली आहे.

८. सामनेवालाने सदर अर्जावर म्हणणे देऊन कथन केले आहे की, अर्जदार हिला अर्ज करण्यास कोणतेही कायदेशीर कारण घडलेले नाही. अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महीलांचे संरक्षण अधिनियम २००५ सोबतनियम २००६ मध्ये अर्ज केलेले आहे, अर्जातील घटनेचा विचार केला असता कोणतीही घटना वस्तुस्थितीमध्ये घडलेली नाही. काल्पनीक घटना मांडून या कायदयानुसार घटना घडल्याच आहे असे दर्शवून अर्ज केलेला दिसतो. काल्पनीक घटना ख-या आहेत असे भासवून केलेला अर्ज रद्द करावा. अर्ज कलम १ लग्नाचे विधान व पुढील २ मुली, अर्जदार २ श्रावणी, अर्जदार ३ ईश्वरी या झाल्या हे मान्य आहे व कबुल आहे. अर्जातील संपूर्ण नातेसंबंध मान्य आहेत. पुढील अर्जातील कथन की, "अर्जदार नंबर १ व सामनेवाला नंबर १ यांचेमध्ये दोघांचा बेडरुम होता व त्या बेडरुम मध्ये टि. व्ही. होता " हे खरे असून मान्य आहे. पुढील कथन की, "नवरा सामनेवाला १ व सासरा सामनेवाला नंबर २ म्हणजे अशोक व दत्तात्रय यांना दारु

पिण्याचे व्यसन होते व दोघेही एकत्रात बसुन दारु पित होते" ही घटना कबुल नाही व मान्य नाही. हिंदु संस्कृतीप्रमाणे वडिलांबरोबर दारु पिणे हे मनाला पटत नाही. तरी अर्जदार काल्पनीक घटना सांगून अर्जाला बळकटी देते. याच्या पुढे ती घटना सांगते की, "सासरा प्रतिवादी नंबर २ बेडरुममध्ये टी. व्ही. पुढे बसून दारु पित होता व दारु प्यायाची झाली की, तेथेच झोपत होता, अर्जदार व तिच्या २ मुली त्यांची बेडरुम असल्याने त्या बेडरुम मध्ये झोपत होत्या व सामनेवाला नंबर १ अशोक नवरा हा अर्जदार नंबर १ सुरेखा शेजारी झोपत होता व या प्रसंगी तो शरीर सुखाची मागणी करीत होता व ते शरीर सुख बळजबरीने घेत होता " ही अर्जातील घटना मानवी बुध्दीला आकलन करण्याच्या पलीकडची आहे. पुढे अर्जदार नंबर १ हीने कथन केले की, “कोरोना काळात सामनेवालानंबर ३ ननंद लता व सामनेवाला नंबर ४ नंदावा शरद १ वर्षभर त्यांच्याच घरात राहत होते व दोघेही अर्जदार नंबर १ व सामनेवाला नंबर १ जेथे झोपतात व ते तेथेच एकाच रुममध्ये झोपत होते तेथेही सामनेवाला नंबर १ जबरदस्तीने अर्जदार नंबर १ शी शरीर संबंध करीत होता. याच खोलीत २ मुली व सासरा याचें समक्ष जबरदस्तीने शरीरसंबंध करीत होता. अर्जदार सकाळी उठल्यावर ननंद व नंदावा यांच्या समोर जाण्याची तिला लाज वाटत होती " हे म्हणने मानवी व्यवहार सोडून जनावराच्या कृतीशी साम्य सांगणारे आहे असे कधी घडलेच नाही. सामनेवाला नंबर १ असे व्यवहार कधी केलेच नाही. सामनेवाला नंबर २ सासरा अर्जदार नंबर १ हिला म्हणत असे की, तु आमच्या घरातून निघून जा, तुला १ काकरी ही जमीन मिळणार नाही. ती पुढे म्हणते की, "अर्जदार नंबर १ बापाच्या घरी गेली नाही तर सर्व मिलिटरी हिस तिला मारण्यासाठी सासरा बोलवून घेईल. सासरा असे कधी म्हणाला नाही हे बळेच सास–याच्या तोंडी कथन घातलेले दिसते. सास–याला मिलिटरी कॅन्टीन मधुन ब–याचश्या वस्तु मिळतात तो गरजेच्या गृह उपयोगी वस्तु आणत होता. पण अर्जदार नंबर १ म्हणते सासरा गृह उपयोगी वस्तु आणत नव्हता हे खोटे आहे.

९. सामनेवालाने पुढे कथन केले आहे की, अर्ज कलम ४ मध्ये पुढील कथन आले आहे की, "सामनेवाला नंबर १ हा नेहमी अर्जदार १ संबंधी म्हणत असे की, हिला कशाला करुन आणली, माझे इच्छे प्रमाणे भेटत नसेल तर मला सोडचिठ्ठी दे अगर कोर्टामार्फत सोडचिठ्ठी घेण्याचा सल्ला तो अर्जदार १ हिला देत

असे " हे म्हणने खरे नाही. याच कारणासाठी तिला सामनेवाला नंबर १ ने बेदम मारहाण केली व घराबाहेर हाकलून दिले व ती मुलीसह घराच्या बाहेर ओसरीवर रात्रभर राहीली हे कथन कपोलकल्पीत आहे व ते स्पष्ट नाकारत आहे. पुढील कथन की, "सामनेवाला नंबर १ मित्रांना घेवून टी. व्ही. पुढे बसत होते व अर्जदार हिला मटन मासे करायला सांगत होते व रात्रीचे १ वाजेपर्यंत दारु पिवून पार्टी करीत होते व पार्टी संपली की, मित्रांना घेवून टी. व्ही. पुढेच झोपत होते, कधी कधी मित्रांना झोपलेले सोडून सामनेवाला नंबर १ हे घराबाहेर जात असत व अर्जदार हि २ मुली घेवून टी. व्ही. पुढे बेडरुम मध्ये झोपत असे. बेडरुम मध्ये २ मुलीसह मित्र झोपत असे व तिला मानसीक त्रास होत असे व एकटे राहण्याची भिती वाटत असे " ही घटना काल्पनीक वाटते असा कोणताही पुरुष नाही कि बेडरुम मध्ये मित्र आहेत व बायकोला सोडून रात्री अपरात्री तो बाहेर जाईल हे खरे नाही व कबूल नाही. सामनेवाला नंबर १ अर्जदार नंबर १ ला उद्देशून म्हणत असे की, मी फक्त तुला शरीर संबंधासाठी करुन आणलेली आहे, अर्जदार १ केवळ उपभोग्य वस्तु आहे, संसार करायचा नव्हता तर या संबंधातुन तीला अर्जदार नंबर २ व ३ या मुली झाल्या हे कसे ? संसार करायचा म्हणून मुली झाल्या. सामनेवाला नंबर २ सासरा अर्जदार नंबर १ हिला उद्देशून कधीही म्हणाला नाही की, तुझ्यामुळे आमच्या घराचे वाटोळे झालेले आहे व आमच्या घरी कोणीही नातेवाईक येत नाही. सामनेवाले नंबर ३ ते ५ यांचे तोंडी अर्जदार १ हिने तिचा सर्व त्रास सांगून पाहिला असता सामनेवाला नंबर ३ ते ५ म्हणायचे की, जिला नांदायचे आहे ती कसेही नांदते. सामनेवाले नंबर १ वर अर्ज कलम ५ मध्ये महत्वाचे दोन आरोप केलेले आहेत पहिला आरोप बैलगाडा शर्यतीसासठी त्याने दोन बैल घेतले, शेतात कोणतेही पिक नसतांना व चारा नसतांना सामनेवाला नंबर १ लोकांच्या शेतातून चोरुन चारा आणत असे. या आरोपाबद्दल सामनेवाला नंबर १ चे म्हणने त्याला शेती करायला बैल नाही, त्याला गाडा पळवण्याची हौस नाही, तो हा नाहक उदयोग कशाला करील. दुसरा आरोप डिजेल चोरीचा आहे. डिजेल चोरले म्हणून डिजेल मालकाने त्याला ५०,०००/– रुपये दंड करुन ती रक्कम घेतली, कोणाचे डिजेल चोरले व कोणी ५०,०००/– रुपये वसुल केले आणि ते पोलीस केस न करता या दोन्ही घटना सामनेवाला नंबर १ हा चोर आहे हे दाखवण्याचा अर्जदार नंबर १ हिचा

उदयोग आहे. सामनेवाला नंबर २ तीला म्हणत असे की, कोंबड्या पाळल्या व आमच्या घरावर द्ररीद्री आली सामनेवाला नंबर २ निवृत्त फौजी आहे तो फौजे सोबत भारतभर फिरला आहे अशी अंधश्रध्दा कशी पाळेल. सामनेवाला नंबर १ चा भाऊ याचे नांव न घेता ते अर्जदार हिच्यावर आरोप करायचे की, तीचे सामनेवाला नंबर १ चे भावा बरोबर अनैतीक संबंध आहेत व त्यामुळेच त्याच्या भावाची बायको लग्नानंतर थोडयाच काळामध्ये ती तीच्या मित्रा बरोबर पळून गेली व सामनेवाला नंबर १ व २ यांचे संशय दूर झाला त्याची बायको कधीही पळून गेलेलीनाही व कुणा बरोबर पळून गेली हे ही अर्जदार सांगत नाही मोघम स्वरुपाचे आरोप केलेले दिसतात. अर्जदाराने सामनेवालाचे चारित्र्य सांगण्याचा एक प्रकार केला मुंबईची एक बाई होती तीला ५ वर्षाचा मुलगा होता, सामनेवाला नंबर १ व मुंबईची बाई हे शिर्डीला लग्न करायला पळून चालले अर्जदार नंबर १ हिच्या भावासह दोघांचा पाठलागत केला. राहुरीमध्ये त्यांना पकडले पोलीस केस झाले त्या केसचा नंबर अर्जात देत नाही जसे काय शिर्डीला चोरुन लग्न करण्याचा अड्डा आहे असे अर्जदार नंबर १ भासवते.

१०. सामनेवालाने पुढे कथन केले आहे की, सामनेवाला नंबर १ याने ईर्टिगा गाडी घेतली तो भाडयाने दयायचा भाडे नसेल तर मुली घेवून या गाडीत जायचा अनेक मुलीशी या गाडीमुळे संबंध आले व निरनिराळया मुली घेवून अफेअर करायचा. रात्र रात्र बाहेर रहायचा. गाडीमुळे ब-याच मुली सामनेवाला नंबर १ बरोबर संबंध ठेवायला तयार झाल्या व तसे संबंध त्याने ठेवले त्या मुली त्याच्या बरोबर राहील्या. एखादया मुलीचे नांव पत्त्यासहीत सांगितले असते व त्याचे लव अफेअर कोर्टापुढे आणले असते तर ही घटना कोर्टाला पटली असती. सगळया सामनेवालाच्या त्रासाला कंटाळून अर्ज कलम ७ मध्ये तीने जीव देण्याचे ठरवले व ती विहीरीकडे निघाली, आसपासच्या लोकांनी तीला जीव देण्यापासून वाचवले ही घटना अर्जदार १ सिध्द करेलच तुर्त एखादया इसमाचे नांव तीने सांगायला हवे होते. पुढील कथन की, तीचे स्त्रीधन मोडले, कोणते स्त्रीधन होते, कोणी केले होते. ते सोन्याचे होते की बेन्टेक्सचे होते तपशील पुरावा नाही. कलम ९ मध्ये ६ महिन्यापूर्वी दारु पिवून सामनेवाला नंबर १ ने तीला घराबाहेर काढले व तेंव्हापासून ती मुलीसह माहेरी रहात आहे ही घटना कबुल नाही तीनेच मुलीसह घर सोडले आहे. मुलीसह

अर्जदार नंबर २ व ३ यांना घेवून अर्जदार नंबर १ ही माहेरी गेल्यापासून प्रयत्न करुनही ती नांदायला येत नाही. सामनेवालानंबर १ खचला व आजारी पडला व मानसीक तोल ढळला व यावर उपाय म्हणून तो साईदिप हॉस्पीटल नगर येथे उपचार घेत आहे. डॉक्टरने त्याला शारिरिक श्रम टाळावे असा सल्ला दिला आहे त्यामुळे तो आज आराम करीत आहे.

११. सामनेवालाने पुढे कथन केले आहे की, अर्जदार नंबर १ ही कपडे शिवण्याची शिलाई मशिन चालविते व स्त्रियांचे कपडे शिवून देते. महिन्याकाठी ३० हजार रुपये तिला उत्पन्न मिळते व मुलींच्या शिक्षणासह ती खर्च भागवते तीला परमदतीची गरज नाही. स्वतंत्र उपजिवीका करणारी स्त्री हा अर्ज करते. ट्रॅक्टर नसतांना सामनेवाला नंबर १ कडे ट्रॅक्टर आहे असे भासवते व निव्वळ उत्पन्न २०,०००/- म्हणते. ईटिंगा गाडी नसतांना गाडी दाखवते, वीस हजार रुपयेचा नफा मांडते, कोहकडीला बागायती शेती दाखवले व शेतीपासून वर्षाला ५ लाख रुपयाचा निव्वळ नफा दाखवते. सामनेवाला नंबर २ याचे उत्पन्न तीस हजार रुपये दरमहा पेंशन व त्याला फौजी म्हणून डोंगरगण, तालुका शिरुर येथे जमीन मिळाली याचे उत्पन्न वर्षाला ५ लाख रुपये दाखवते. सामनेवाला नंबर १व२ यांचे भरघोस उत्पन्न दाखवलेले आहे. गट ज 23५ मधील सामनेवाला नंबर १ याचे नांवावर समाईकातील क्षेत्र /४२ आर आहे त्यामध्ये सामनेवाला नंबर १, २, ३, ५ व त्याचा भाऊ राजेंद्र दत्तात्रय यांचेमध्ये विहीर आहे व कांदा, बाजरी उत्पन्न घेतो, भावाचा निम्मा हिस्सा अलग आहे. २१ गुंठ्यामध्ये सामनेवाला नंबर १, २, ३, ५ यांचे हिस्से आहे. खाण्या इतकेही उत्पन्न मिळत नाही. कांदा केला तर त्याला बाजारभाव नाही, भाव बांधलेले नाही. स्वामीनाथन आयोग लागू नाही. तसेच गट नंबर २२० यामध्ये वरीलप्रमाणे परिस्थिती आहे व सगळी जमीन एकोणवीस गुंठे आहे त्या भावाच्या वाटणीला ०.०९.५ गुंठे जमीन गेली. एवढयाच जमीनीवर सामनेवाला नंबर १ चा हक्क आहे. जमीनीत भागत नसल्यामुळे तो मजूर म्हणून कामाला आहे. सामनेवाला नंबर २ ची डोंगरगण, ता. शिरुर येथे गट नंबर ३२० वाटणी नंबर ४ क्षेत्र १ हेक्टर १५ आर जमीन आहे. व ती पिकाऊ आहे, नदीकिनारी आहे परंतु सामनेवाला नंबर २ आज ६५ वर्षाचा आहे व निवृत्त फौजी आहे तो जमीन करत नाही, वाटयाने कोणी करीत नाही. महिना ३२,०००/- रुपये पेंशन

आहे ही जमीन व पेंशन त्याची स्वकमाईची आहे. एकत्र कुटूंबाच्या मालकीची नाही. सुनेचा सास–याच्या मिळकतीवर कायदेशीर हक्क नाही.

१२. सामनेवालाने पुढे कथन केले आहे की, विनंती कलम मध्ये कलम १८, कलम १९ व १९(३), कलम २० या मागण्या करण्यासाठी व मिळवण्यासाठी कौटूंबिक हिंसाचार महिलांचे संरक्षण कायदयाप्रमाणे कोणत्याही मागण्या बसत नाही. सामनेवाला नंबर १ हा तिला नांदवायला तयार आहे. मुलींचे पालन पोषण व शिक्षण व लग्न स्वखर्चाने करण्यास तयार आहे. त्याची तजवीज म्हणून सामनेवाला नंबर २ येणा–या पेंशन मधून प्रत्येक मुलीसाठी दरमहा १५००/– स्टेट बँक, शाखा शिरुर हा अर्ज करण्याच्या पूर्वीपासून टाकीत आहे व येथुन पुढे ही टाकणार आहे. या सर्व बाबींचा विचार करून अर्जदाराचा अंतरिम पोटगीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती सामनेवालाने केली आहे.

१३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सामनेवाला यांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी सिध्द होते काय ? | ..होय. |
| २. | अर्जदार हे मागणीप्रमाणे सामनेवाला क्र.१ कडुन अंतरीम पोटगी व खर्च मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | ..होय, आदेशाप्रमाणे. |
| ३. | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करीता** –

१४. अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाचे पुष्ट्यर्थ तिचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्ज व शपथपत्र वाचले. नि.३ सह अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचार घटनेचा माहीती

अहवाल, तिच्या आधारकार्डची प्रत दाखल केली आहे. तिने तिचे मालमत्ता व उत्तरदायीत्वचे शपथपत्र नि.१७ वर दाखल केले आहे. अर्जदाराने गट नंबर २२०, २३५ आणि ३२०/४ चा ७/१२ उतारा नि.१९ वर दाखल केले आहे व नि.३१ वर वस्तूंचे बिले दाखल केले आहे. सामनेवालाने त्याचे मालमत्ता व उत्तरदायीत्वचे शपथपत्र नि.२६ वर दाखल केले आहे व नि.२९ वर सामनेवाला क्र.२ व ३ यांचेसाठी बँकेमध्ये दरमहा प्लॅनप्रमाणे टाकलेल्या रकमेचे पावत्या आणि सामनेवाला क्र.१ याचे मेंदूच्या आजारावर उपचार घेत असल्याबाबत केस पेपर दाखल केले आहे.

१५. अर्जदार हिच्या नि.१ वरील कथनानुसार अर्जदाराने तिचे अर्जात तिला सामनेवालाने शारिरिक, मानसिक व आर्थिक छळ करुन अर्जदार हीस मारहाण केल्याचे, तिला पैशाच्या कारणावरून मारहाण केल्याचे, अर्जदारावर संशय घेऊ लागल्याचे, अर्जदारास सामनेवाला दारू पिऊन येऊन तिला मारहाण केल्याचे व सामनेवालाचे एका महिलेसोबत अफेअर चालू असल्याचे अर्जदाराने कथन केले आहे. तसेच अर्जदाराने सा.वाले यांनी कोणतेही संयुक्तीक कारण नसताना अर्जदार यांचा विनाकारण त्याग केला असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

१६. दुसरीकडे सामनेवालाने सदर आरोप नाकारले आहे व अर्जदार ही अर्जदार क्र.२ आणि ३ यांना घेऊन माहेरी गेल्यापासून प्रयत्न करूनही ती नांदायला येत नसल्याचे कथन सामनेवाला यांनी केले आहे.

१७. अर्जदार व सामनेवाला यांनी वरील केलेले एकमेकांविरुध्द आरोप व प्रत्यारोप पाहता सदर आरोप व प्रत्यारोपमधील बाबी सिध्द करण्याची जबाबदारी अर्जदार व सामनेवाला यांची राहणार आहे. प्रथमदर्शनी या स्थितीला अभिलेखावर संरक्षण अधिकारी यांचा कौटुंबिक हिंसाचार घटनेचा माहीती अहवाल दाखल आहे व तसेच प्रस्तुत अर्जास अर्जदाराने शपथपत्र दाखल केले आहे. जरी दोन्ही बाजुंनी एकमेकांवर सदर केलेले आरोप हे सिध्द होणे बाकी असुन तरी प्रस्तुत अर्जात अर्जदार अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे किंवा नाही तसेच तिला प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला किंवा नाही याबाबत प्रथमदर्शनी निष्कर्ष काढणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांनी एकमेकांवर केलेले सर्व आरोप

सिध्द करणेची जबाबदारी त्यांच्यावर असुन या स्थितीला अर्जदाराने तिचेवर झालेले तथाकथीत कौटुंबिक हिंसाचार शपथपत्राद्वारे मांडले असुन तसेच कौटुंबिक हिंसाचार घटनेचा माहीती अहवाल पाहता तसेच अर्जदार क्र.१ बाबत सामनेवाला याने तिच्या उदरनिर्वाहाची सोय केली का याबाबत सामनेवालाने काही कथन केले नसल्याचे पाहता अर्जदाराचा या स्थितीला आर्थिक छळ झाल्याचे प्रथमदर्शिनी दिसते व प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे दिसते. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

<u>**मुद्दा क्र.२ व ३ करीता –**</u>

१८. प्रस्तुत अर्जाव्दारे अर्जदार हिने मूळ अर्जाचे काम प्रलंबीत असताना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी प्रत्येकी दरमहा रक्कम रु.१०,०००/– अंतरीम पोटगी सामनेवालाकडुन देणेचा आदेश होणेकामी विनंती केली आहे.

१९. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार व सामनेवाला यांचे नातेसंबंधाबाबत कोणताही वाद नाही. अर्जदाराच्या कथनानुसार सामनेवाला यांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ केला आहे. अर्जदाराचे कथनानुसार सामनेवाला यांची आर्थिक परिस्थिती अतिशय चांगली आहे. सा.वाले नं. १ यांचेकडे स्वतःचा ट्रॅक्टर असून सदर ट्रॅक्टर हा दुसऱ्यांच्या शेतामध्ये नांगरणी, पेरणी शेतीची सर्व मेहनत मशागतीची कामे करत आहे व त्यांना त्यापासून खर्च वजा जाता निव्वळ रक्कम रुपये २०,०००/– चे उत्पन्न मिळत आहे. तसेच सामनेवाले क्र.१ यांचेकडे स्वतःची एर्टिगा कार असून सदर कार हि भाड्याने देण्याचा व्यवसाय करत असून त्यापासून त्यांना खर्च वजा जाता निव्वळ २०,०००/– रुपयांचा नफा मिळत आहे. तसेच सामनेवाले यांचे नवे कोहकडी येथे बागायती शेत जमीन असून त्यातून सदर शेतीमध्ये कांडा, ऊस, गहू हे पिके घेत असून त्यापासून देखील त्यांना वर्षाला रक्कम रुपये ५ लाख निव्वळ नफा मिळत आहे. तसेच सामनेवाले क्र.२ हे आर्मी मधून रिटायर झाले असून त्यांना महिन्याला ३०,०००/– रुपये पेन्शन मिळत आहे. सामनेवाले क्र.२ यांचे नावे डोंगरगण ता. शिरूर याठिकाणी ४ एकर बागायती शेतजमीन असून त्या शेतीमधून डाळिंब, बाजरी, ऊस आणि गहू इत्यादी पिके घेत असून त्यापासून ५ लाख रुपये वर्षाला नफा मिळत आहे व सामनेवाले यांची

परिस्थिती अतिशय सधन असल्याचे व त्यांची अर्जदारांना पोटगी देण्याची कुवत असल्याचे त्यांनी कथन केले आहे.

२०. या स्थितीला अर्जदार यांनी दाखल केलेले मालमत्ता व उत्तरदायीत्वच्या शपथपत्रामध्ये अर्जदाराने तिचा महीन्याचा एकुण खर्च रु.२६,५००/- असल्याचे कथन केले आहे. तसेच सामनेवाला याची शेती व चारचाकी गाडी भाड्याने देणेचा व्यवसाय असल्याचे व त्याचे मासिक पगार माहित नसल्याचे कथन केले आहे. अर्जदाराने सा.वाले नं. १ याचेकडे स्वतःचा ट्रॅक्टर असल्याबाबत सदर ट्रॅक्टर हा दुसऱ्यांच्या शेतामध्ये नांगरणी, पेरणी शेतीची सर्व मेहनत मशागतीची कामे करत असल्याबाबत व त्यांना त्यापासून खर्च वजा जाता निव्वळ रक्कम रुपये २०,०००/- चे उत्पन्न मिळत असल्याबाबत तसेच सामनेवाले क्र.१ याचेकडे स्वतःची एर्टिगा कार असल्याबाबत व सदर कार हि भाड्याने देण्याचा व्यवसाय करत असून त्यापासून त्यांना खर्च वजा जाता निव्वळ २०,०००/- रुपयांचा नफा मिळत असल्याबाबत यास्थितीला अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तसेच सामनेवाले क्र.२ हे आर्मी मधून रिटायर झाले असून त्यांना महिन्याला ३०,०००/- रुपये पेन्शन मिळत आहे असे कथन अर्जदाराने केले आहे व सामनेवाला यांनी सामनेवाला क्र.२ यास महिना ३२,०००/- रुपये पेन्शन असल्याचे कथन केले आहे. मात्र सामनेवाला क्र.१ असताना अर्जदारास अंतरिम पोटगी सामनेवाला क्र.२ कडून देणे योग्य होणार नाही. अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे कि सामनेवाले क्र.२ यांचे नावे डोंगरगण ता. शिरूर याठिकाणी ४ एकर बागायती शेतजमीन असून त्या शेतीमधून डाळिंब, बाजरी, ऊस आणि गहू इत्यादी पिके घेत असून त्यापासून ५ लाख रुपये वर्षाला नफा मिळत आहे. सामनेवाला यांनी त्याबाबत सामनेवाला क्र.२ यांची डोंगरगण ता. शिरूर येथे गट नंबर ३२० वाटणी नंबर ४ केशत्र १ हे १५ आर जमीन असल्याचे व ती पिकाऊ असल्याचे नदीकिनारी असल्याचे आणि सामनेवाला क्र.२ हा ६५ वर्षाचा असल्याने तो जमीन करत नसल्याचे व वाट्याने कुणी करत नसल्याचे आणि ती जमीन त्याचे स्वकमाईची असल्याचे कथन केले आहे. अर्जदाराने मात्र गटाबाबत किंवा जमिनीबाबत सामनेवाला क्र.१ चा हिस्सा असल्याचे किंवा तो ती जमीन कसून

त्यातून उत्पन्न घेत असल्याबाबत काही कागदोपत्री पुरावा या स्थितीला दाखल केलेला नाही.

२१. दुसरीकडे सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ हि कपडे शिवण्याची शिलाई मशीन चालवते व स्त्रियांचे कपडे शिवून देत असल्याचे तिला महिन्याकाठी ३०,०००/– रुपये तिला उत्पन्न मिळत असल्याचे व मुलींच्या शिक्षणासह ती खर्च भागवते तिला परमदतीची गरज नसल्याचे कथन केले आहे. मात्र त्यासंदर्भात सामनेवाला यांनी कोणताही पुरावा या स्थितीला दाखल केलेला नाही. तसेच सामनेवाला यांनी कथन केले आहे कि सामनेवाला क्र.१ यांचे नावावर सामाईकातील गट नंबर २३५ मधील ४२ आर क्षेत्र आहे त्यामध्ये सामनेवाला क्र.१, २, ३ आणि ५ व त्याचा भाऊ राजेंद्र यांचेमध्ये विहीर आहे व कांदा बाजरी उत्पन्न घेतात व भावाचा निम्मा हिस्सा अलग आहे आणि २१ गुंठ्यामध्ये सामनेवाला क्र.१, २, ३ आणि ५ यांचे हिस्से आहे त्यांना खाण्याइतकेही उत्पन्न मिळत नाही आणि कांदा केला तर त्याला बाजारभाव नाही, भाव बांधलेले नाही व तशीच परिस्तिथी गट नंबर २२० मध्ये आहे व सगळी जमीन १९ गुंठे आहे त्यात भावाच्या वाटणीला ०.०९.५ गुंठे जमीन गेली आणि एवढ्याच जमिनीवर सामनेवाला क्र.१ चा हक्क आहे. अभिलेख पाहता अर्जदाराने कोहकडी गावातील गट नंबर २२०, २३५ आणि ३२०/४ चे ७/१२ उतारे दाखल केले असून त्यापैकी गट नंबर २२० व २३५ मध्ये सामनेवाला क्र.१ याचे नावाची नोंद इतर सहहिस्सेदारांसह सामाईक क्षेत्रावर असल्याचे दिसते व व त्यातून कांद्याच्या पिकाची नोंद असल्याचे दिसते. सदर जमिनी जिरायत स्वरूपाच्या असल्याचे दिसते. त्यापासून त्यांना वर्षाला रक्कम रुपये ५ लाख निव्वळ नफा मिळत असल्याचे यास्थितीला स्प्ष्ट दिसत नाही. मात्र हे नमूद करणे महत्वाचे आहे कि त्या शेतीपासून सामनेवाला यास काही तरी उत्पन्न मिळत असेलच.

२२. दोन्ही बाजुंकडुन एकमेकांच्या उत्पन्नाबाबत स्पष्ट कागदोपत्री पुरावा या स्थितीला दाखल केला नाही व केवळ अर्जदाराकडून सामनेवाला क्र.१ चा गट नंबर २२० आणि २३५ मध्ये हिस्सा असल्याबाबत तिने ७/१२ उतारे दाखल केले आहेत. त्यामधुन सामनेवाला हे कांद्याचे पीक घेत असल्याचे प्रथमदर्शनी दिसते व त्यावरून सामनेवाला यास काही तरी उत्पन्न मिळत असेल हे यास्थितीला ग्राह्य

धरता येऊ शकते. तसेच येथे नमुद करणे महत्वाचे आहे की सामनेवाला क्र.१ चे वय ३५ वर्षे त्याच्या मालमत्ता व उत्तदायित्वाचे शपथपत्रात नमुद असुन त्या वयाचा व्यक्ती निश्चितच दररोज रु.३०० ते ४००/– सहज कमावु शकतो असे गृहीत धरता येईल. सामनेवाला क्र.१ हा आजारी पडला व त्याचा मानसिक तोल ढळला व यावर उपाय म्हणून तो साईदीप हॉस्पिटल नगर येथे उपचार घेत असल्याचे व डॉक्टरने त्यास शारीरिक श्रम टाळावे असा सल्ला दिला असल्याचे व तो आज आराम करत असल्याचे कथन सामनेवाला यांनी केले आहे. तसेच त्याबाबत सामनेवाला यांनी नि.२९/३ वर साईदीप हॉस्पिटल मधील डॉक्टरांचे मेडिकल प्रेस्क्रिप्शन दाखल केले आहे व त्यामध्ये डिप्रेशन विथ सायकॉटिक फीचर्स असे डायग्नोसिस असल्याचे नमूद आहे. मात्र यास्थितीला केवळ त्याआधारे सामनेवाला क्र.१ हा कोणतेही काम करत नाही असा निष्कर्ष काढला जाऊ शकत नाही. सामनेवाला यांचेकडील शेतीमधील उत्पन्न पाहता व सामनेवाला यांचे वय पाहता सामनेवाला क्र.१ याची पती व पिता म्हणून अर्जदारांना सांभाळण्याची, त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय करण्याची नैतिक व कायदेशिर जबाबदारी आहे. सामनेवाला क्र.१ याने

२३. मुलींचे पालन पोषण व शिक्षण व लग्न स्वखर्चाने करण्याबाबत तयार असल्याचे कथन केले आहे आणि त्याची तजवीज म्हणून सामनेवाला क्र.२ यांचे येणाऱ्या पेन्शन मधून प्रत्येक मुलीसाठी दरमहा १५००/– रुपये स्टेट बँक शाखा शिरूर हा अर्ज करण्याच्या पूर्वीपासून टाकत असल्याचे व येथूनही पुढे टाकणार असल्याचे कथन केले आहे. त्याबाबत सामनेवाला यांनी नि.२९/१ आणि २९/२ वर पावत्या दाखल केल्या आहेत. मात्र अशी जरी परिस्तिथी असली तरीही ती तरतूद मुलींच्या भविष्यासाठी असल्याचे प्रथमदर्शनी दिसते मात्र आता मुलींच्या लहान वयात त्यांचे पालन पोषणासाठी आणि सध्याच्या शिक्षणासाठी त्यांना सामनेवाला याने पोटगी देणे गरजेचे वाटते. अर्जदार क्र.१ हिस प्रथमदर्शनी दिसत असलेला झालेला कौटुंबिक हिंसाचार पाहता व सामनेवाला क्र.१ याने अर्जदारांची आताच्या काळासाठी अन्नवस्त्राची सोय न केल्याचे प्रथमदर्शनी दिसत असलेले पाहता व सामनेवाला क्र.१ याची अर्जदार यांचे पालनपोषणाची व अन्नवस्त्राची सोय करण्याची प्रथमदर्शनी दिसत असलेली नैतिक जबाबदारी पाहता अर्जदार क्र.१ हिस दरमहा रु.२,०००/– आणि अर्जदार क्र.२ आणि ३ यांना प्रत्येकी दरमहा

१,५००/– रुपये अंतरिम पोटगी प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन देणे न्यायोचित होईल असे मला वाटते.

२४. परिणामस्वरुप सर्व तथ्य आणि मुद्दा क्र.१ च्या नोंदविलेल्या निष्कर्षाचा विचार करता प्रकरणाच्या या टप्प्यावर सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हीस दरमहा २०००/– आणि अर्जदार क्र.२ आणि ३ यांना दरमहा प्रत्येकी १५००/– रुपये, प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून अंतरीम पोटगी देणे न्यायोचीत होईल असे मला वाटते. सबब, मुद्दा क्र.२ चे उत्तर अंशतः होकारार्थी देऊन मुद्दा क्र.३ बाबत खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| २. | सामनेवाला क्र. १ याने सदर अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि. २२/११/२०२४ पासुन अर्जदार क्र.१ हीस दरमहा २०००/– रुपये आणि अर्जदार क्र.२ आणि ३ यांना दरमहा प्रत्येकी १५००/– रुपये अंतरीम पोटगी म्हणुन द्यावेत असे आदेशीत करण्यात येते. |

सही/–

(एन. एस. सबनीस)

दि. १७/०३/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

(न्यायालय क्र.२), पारनेर